MHRT050009402022 **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६९/२०२२ मधील**

**निशाण २१ खालील आदेश**

**श्रीम. कुंदा पांडुरंग मोरे व. ३**

**वि.**

**प्रविण पांडुरंग मोरे व. ४**

प्रस्तुतचा अर्ज हा सामनेवाला यांनी या न्यायालयास मुळ अर्ज चालवण्याचे प्रादेशिक अधिकारक्षेत्र नसल्याने काढून टाकण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जातील कथनाप्रमाणे सदरचे प्रकरण हे अर्जदार यांनी कै. पांडुरंग मोरे यांचे वारस निश्चीत करण्याबाबत दाखल केले आहे. सदर प्रकरणामध्ये सामनेवाला यांना नोटीस लागलेली नाही तरीदेखील सदर अर्जाची माहिती मिळाल्याने सामनेवाला हे स्वत:हून याकामी हजर झालेले आहेत. अर्जदार यांनी मुळ अर्ज दाखल करताना न्यायालयापासुन सत्यता लपवली आहे. सदरचे प्रकरण चालविण्याकरीता या न्यायालयास अधिकारक्षेत्र नसुन मा.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, पुणे या न्यायालयास आहेत. अर्जदार यांनी मुळ अर्जात पांडुरंग मोरे हे या न्यायालयाच्या न्यायकक्षेमध्ये वास्तव्यास असल्याचे खोटे नमुद केले आहे. तसेच त्यांच्या मृत्युचे ठिकाण देखील अर्जामध्ये लपवले आहे. सदर अर्जदार स्वच्छ हाताने न्याय मागण्याकरीता आलेले नसुन केवळ सामनेवाला यांची गैरसोय कशी होईल याकरीता या न्यायालयाच्या न्यायकक्षेत सदरचे प्रकरण चालवत आहेत. सामनेवाला यांनी जाणुनबुजून पांडुरंग मोरे यांची विधवा श्रीम. मिरा उर्फ कुंदा मोरे यांचा समावेश केलेला नाही. मिरा उर्फ कुंदा मोरे यांनी पांडुरंग मोरे यांची सेवा सुश्रुषा ही लग्न झाल्यापासुन केलेली आहे. त्यांनी पांडुरंग मोरे यांना सन २००९ मध्ये एक मुत्रपिंडदेखील दान केले आहे. सदरची शस्त्रक्रिया ही पुणे येथील कमांड हॉस्पीटल साउथर्न कमांड, पुणे

याठिकाणी झालेली आहे. त्यामुळे पांडुरंग मोरे व मिरा उर्फ कुंदा मोरे हे कित्येक वर्षे वास्तव्यास असल्याचा हा सबळ पुरावा ग्राहय धरण्यात यावा. पांडुरंग मोरे यांचा मृत्युदेखील कमांड हॉस्पीटल साउथर्न कमांड, पुणे याठिकाणी झाला आहे. पांडुरंग मोरे यांचा कायमचा पत्ता हा शुभम निवास स.न.४८ p ७/१ आनंद पार्क, विश्रांतवाडी, पुणे ४११०१५ असा होता. मृत्युसमयीही पांडुरंग मोरे याच पत्यावर वास्तव्यास होते. तशी मृत्युनोंद त्यांच्या मृत्युदाखल्यावर आहे. पांडुरंग मोरे यांचा कैक वर्षे निवास हा पुणे याठिकाणीच होता त्यामुळे मुळ अर्ज चालवण्याचे प्रादेशिक अधिकार या न्यायालयास प्राप्त होत नाहीत त्यामुळे सदरचा अर्ज काढुन टाकण्यात यावा अशी विनंती सदर अर्जाद्वारे केली आहे.

०३. याकामी सामनेवाला यांनी म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी म्हणण्यामध्ये अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जावर सामनेवाला यांनी आजतागायत म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज दाखल करण्यास कोणतीही तरतूद नाही. तसेच अधिकारतेचा प्रश्न हा कायदा वस्तुस्थिती व घटना या पुराव्याच्या बाबीवर अवलंबून आहे. सामनेवाला यांनी म्हणणे दाखल न करता सदर दाखल केलेला हा अर्ज पूर्ण बेकायदेशीर व चूकीचा आहे. पांडुरंग मोरे यांचेवर अंत्यसंस्कार हे शिवतर गावी झाले असून त्यांच्या मालकीच्या मिळकतीदेखील शिवतर ता.खेड येथेच आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज चालवणेचा या न्यायालयास पूर्ण हक्क व अधिकार आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा असे म्हटले आहे.

०४. अर्ज, म्हणणे, मूळ अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजुच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच सामनेवाला तर्फे नि. २६ कडे दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले.

०५. सामनेवाला यांनी लेखी युक्तीवादामध्ये अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद नमुद केला आहे. तसेच मुळ प्रकरण हे अर्जदार यांनी कोणत्या कायद्याखली दाखल केले आहे याची पुष्टी कोठेही दिलेली नाही. बॉम्बे रेग्युलेशन कायद्याअंतर्गत मयत इसमाची स्थावर अथवा अस्थावर मिळकत नमुद असणे अपेक्षित असते परंतु नमुद प्रकरणामध्ये पांडुरंग मोरे यांचे वारस घोषित करुन मागण्यात आले आहेत. त्यामुळे मुळ अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायद्याअंतर्गत दाखल झाले नसल्याचे स्पष्ट होते. अर्जदार यांनी मुल्यांकन रक्कम वाचवण्याकरीता न्यायालयाची दिशाभुल केलेली आहे. मयत इसमांचा मृत्यु ज्याठिकाणी झाला त्या न्यायालयास वारस घोषित करण्याचे अधिकार आहेत आणि केवळ मयतास स्थावर निवास नसेल तरच आणि तरच जिथे मयताची मिळकत असेल तेथे नमुदचे प्रकरण दाखल करावयाचे अधिकारक्षेत्र आहे. पांडुरंग मोरे यांचे निवासस्थान पुणे येथील नमुद पत्यावर होते. शेवटच्या क्षणी देखील पांडुरंग हे पुणे येथेच वास्तव्यास होते व त्यांचा मृत्युदेखील पुणे येथेच झाला आहे. अर्जदार हे स्वत: पुणे मुंबई येथे वास्तव्यास असुनदेखील व मुळ अधिकारक्षेत्र माहित असतानादेखील सामनेवाला यांना त्रास देण्याच्या उद्देशाने सदरचे प्रकरण हे या न्यायालयात दाखल केले आहे. सदर प्रकरणाचे अधिकारक्षेत्र हे पुणे येथील दिवाणी न्यायालय वरिष्ट स्तर असे आहे. पांडुरंग मोरे यांचा प्रथम विवाह हा विच्छेदित झाला असल्याकारणाने त्यांच्या द्वितीय पत्नी सामनेवाला यांची आई श्रीम. कुंदा उर्फ मिरा मोरे या पांडुरंग मोरे यांच्या कायदेशीर वारस ठरतात. ही सत्यता न्यायालयापासुन लपवली आहे. मिरा उर्फ कुंदा मोरे हया हयात असुनदेखील त्यांना याकामी समाविष्ठ केले नाही त्यामुळे अर्जास नॉनजॉइंडर ऑफ नेसेसरी पार्टी या तत्वाची बाधा येते. या सर्व कारणांचा विचार करता सदरचे प्रकरण काढुन टाकण्यात यावे असा युक्तीवाद सामनेवाला यांनी दाखल केला आहे.

०६. अर्जदार यांनी अर्ज दाखल करुन पांडुरंग मोरे यांचे अर्जदार व सामनेवाला हे वारस असल्याचा दाखला मिळण्याची विनंती केली आहे. अर्जातील कथनाप्रमाणे पांडुरंग मोरे हे दि. ०५.०९.२०१६ रोजी मयत झाले असुन त्यांच्या शिवतर, ता. खेड याठिकाणी घर व जमीन मिळकती आहेत. अर्जदार क्र. १ ही पांडुरंग मोरे यांची पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ तसेच सामनेवाला क्र. १ ते ४ ही पांडुरंग मोरे यांची मुले आहेत. पांडुरंग मोरे यांची दोन लग्ने झाली होती. त्यापैकी अर्जदार क्र. १ ही पहिली व कायदेशीर पत्नी असुन तिच्यापासुन अर्जदार क्र. २ व ३ ही मुले आहेत. तर मिरा पांडुरंग मोरे ही दुसरी पत्नी असुन तिच्यापासुन सामनेवाला क्र. १ ते ४ ही मुले आहेत. पांडुरंग मोरे यांना अर्जदार व सामनेवाला यांच्याशिवाय अन्य कोणीही वारस नाही. वेगवेगळया ठिकाणी वारस म्हणुन नोंदणी करण्याकरीता वारस दाखल्याची आवश्यकता आहे म्हणून अर्जदार व सामनेवाला हे पांडुरंग मोरे यांचे कायदेशीर वारस आहेत असा दाखला मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०७. प्रस्तुत अर्जाच्या पृष्ट्यर्थ अर्जदार यांनी पांडुरंग मोरे यांचा मृत्युदाखला, सरपंच ग्रामपंचायत शिवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी व पोलीस पाटील, शिवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी यांचा वारस दाखला, अर्जदारचे ओळखपत्र, रेशनकार्ड तसेच मौजे शिवतर ता.खेड, जि.रत्नागिरी येथील भूमापन क्र. ६७५ व ४४२ सातबारा उता–याच्या प्रती दाखल केल्या आहेत.

०८. मुंबई विनियम VIII, १८२७ या अधिनियमातील तरतुदीनुसार एखादी व्यक्ती कोणतेही मृत्युपत्र न करता मृत्यु पावली तर जंगम किंवा स्थावर मालमत्तेसाठी त्याचे वारसांना न्यायालयाकडून वारस दाखला घेण्याची गरज लागते. मुंबई विनियम VIII, १८२७ या अधिनियमाचा हेतू हा कायदेशीर वारसांची औपचारीक मान्यता देण्यापुरता मर्यादित आहे. वारस प्रमाणपत्र एखाद्या व्यक्तीला कोणत्याही मृत व्यक्तीच्या

वारसाचा दर्जा प्राप्त करुन देत नाही. तो दर्जा व्यक्तीगत, धार्मिक कायद्यान्वये अंगभूतच असतो.

०९. जेंव्हा एखाद्या व्यक्तीला मृत व्यक्तीच्या जंगम/स्थावर मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याची इच्छा असेल किंवा वारस महणून त्याचा हक्क वादग्रस्त असेल किंवा मालमत्ता ताब्यात असलेल्या व्यक्ती किंवा संस्था यांना सुरक्षिततेची हमी दयायची असेल व त्यांच्याबरोबर व्यवहार करायचा असेल तेंव्हा त्याला त्याच्या वारसाहक्काची औपचारिक मान्यता न्यायालयाकडून घेणे आवश्यक ठरते त्यावेळी वारसा दाखल्यासाठी मृत व्यक्तीचा वारस अर्ज करु शकतो.

१०. अर्जदार यांनी ते पांडुरंग मोरे यांचे वारस असल्याने त्यांच्या पश्चात विविध ठिकाणी वारस नोंद करण्याकरीता वारसा दाखल्याची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज दाखल केल्याचे कथनावरुन स्पष्ट होते. अर्जदारतर्फे वकील श्री. गांधी यांनी मयत पांडुरंग मोरे यांच्या मालकीच्या स्थावर मालमत्ता शिवतर खेड येथे असल्याने त्याच्या व्यवस्थापनाकरता व त्या मिळकतींचा वारस तपास होणे बाकी असल्याने वारस दाखला मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याचा युक्तीवाद केला आहे.

११. सामनेवाला यांनी अर्जदार क्र. २ व ३ हे मयत पांडुरंग यांची मुले असल्याची बाब नाकारलेली नाही. अर्जदार क्र. १ ही मयत पांडुरंग यांची वारस आहे किंवा कसे ही बाब पुराव्यावरुन शाबित होईल. सामनेवाला यांनी मयत पांडुरंग मोरे हे पुणे येथे कायमपणे वास्तव्यास होते तसेच त्यांचे निधनही पुणे येथील दवाखान्यात झाले असल्याचे कथन केले आहे. सदर कथनांच्या पृष्टयर्थ त्यांनी मयत पांडुरंग मोरे यांच्या मृत्युदाखल्यावर भिस्त ठेवली आहे. मयत पांडुरंग मोरे यांच्या मृत्युदाखल्याचे अवलोकन केले असता त्यावरती पांडुरंग मोरे यांच्या मृत्युसमयीचा पत्ता हा "शुभम

निवास, एस.आर.४८ पी ७/१ आनंद पार्क, विशांतवाडी, पुणे, पुणे सिटी, पुणे महाराष्ट्र–४११०१५" असा तर मृत्युचे ठिकाण हे कमांड हॉस्पीटल (एस.सी.) पुणे नमुद असल्याचे दिसुन येते. सामनेवाला हे पुणे येथील रहिवासी असल्याचा इतर कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. याउलट अर्जदार यांनी याकामी सरपंच ग्रामपंचायत शिवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी व पोलीस पाटील, शिवतर, ता.खेड, जि.रत्नागिरी यांचे वारस दाखले हजर केले आहेत. त्याचे अवलोकन करता मयत पांडुरंग हे शिवतर गावचे रहिवासी होते असे नमुद केल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार यांनी मौजे शिवतर ता.खेड, जि.रत्नागिरी येथील भूमापन क्र. ६७५ व ४४२ सातबारा उता–याच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्याचे अवलोकन करता मयत पांडुरंग यांच्या नावे जमीन मिळकत असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला यांनी मयत पांडुरंग याच्या या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात स्थावर मिळकती नसल्याचा पवित्रा घेतलेला नाही.

१२. भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ च्या भाग १० कलम ३७१ नुसार ज्याच्या अधिकारतेत मृत व्यक्ती आपल्या मृत्युसमयी ज्या भागात राहत होती किंवा जर त्यावेळी मृत व्यक्तीला स्थिर वास्तव्यस्थळ नसेल तर ज्याच्या अधिकारतेत मृताच्या संपत्तीचा कोणताही भाग येतो त्यावेळी तेथील मा. जिल्हा न्यायाधीश वारसा प्रमाणपत्र प्रदान करु शकतात. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे प्रकरण १४, परिच्छेद ३०४ व ३०५ नुसार तसेच शासकीय अधिसूचना क्र.१८६१ दि.२५.१०.१८९० नुसार सर्व दिवाणी न्यायाधीश यांना भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे प्रकरण १० खालील अर्ज व मुंबई विनियम VIII १८२७ चे कलम २ नुसार दाखल अर्ज चालवणेसाठी मा. जिल्हा न्यायाधिशांचे सर्व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. भारतीय उत्तराधिकार अधिनियम चे कलम ३९० नुसार भारतीय उत्तराधिकार अधिनियम मधील तरतुदी ह्या मुंबई विनियम VIII

१८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र देताना लागू होतात. मयत पांडुरंग मोरे यांचे वास्तव्य नेमके कोठे होते ही बाब वादातीत असल्याने ती पुराव्याने शाबित होईल. मयत पांडुरंग मोरे यांच्या स्थावर मालमत्ता या न्यायालयाच्या कक्षेत नसल्याचा पवित्रा सामनेवाला यांनी घेतलेला नाही. अभिलेखावरील दाखल कागदपत्रावरुन मयत पांडुरंग मोरे यांच्या नावे स्थावर मिळकती असून त्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत असल्याचे दिसून येते. मयत पांडुरंग मोरे यांच्या स्थावर मिळकती या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात असल्याने सदरचा अर्ज चालविण्याचे प्रादेशिक अधिकार या न्यायालयास आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणे उचित होणारे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करते.

**आदेश**

०१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2025.03.10 18:18:23 +0530

**दिनांकः ०६.०३.२०२५**

**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,**
**ता. खेड, जि. रत्नागिरी**

# CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | C.M.A. No. 69/2022 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Smt.S.K.Kharat |
| Court Name | : | $2^{nd}$ Jt. CJJD & JMFC, Khed |
| Date of Decision | : | 06.03.2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06.03.2025 |
| Order uploaded on | : | 10.03.2025 |